MHKO120001452015

<u>नियमित दिवाणी दावा क्र.३२/२०१५</u>

(CNR No.MHKO120001452015)

## निशाणी क्र.१२२ खाली आदेश

वादी यांनी सदर अर्ज दाखल करुन वृक्ष अधिकारी तथा परिक्षेत्र वन अधिकारी कडगांव यांना साक्षीसाठी हजर राहण्याकरीता साक्षी समन्स पाठविणेची विनंती केली आहे.

०२. वादी यांच्या कथनानुसार, वादी यांनी आपले मालकीचे मौ. पाटगांव, ता. भुदरगड येथील गट क्र.५२/अ या जमिनीती झाडे तोडणेसाठी वनक्षेत्रपाल, कडगांव परिक्षेत्र यांचेकडे रितसर अर्ज देवुन मागणी केली. त्यानंतर संबंधीत अधिकारी यांनी येवुन झाडांना मार्कींग करुन वादी यांना ७५ झाडे तोडण्यास परवानगी दिली होती. त्यानुसार वादींनी ७५ झाडे तोडुन त्यांचे ढिग केले व वाहुन नेणार एवढ्यात प्रविादी क्र.६, त्यांचे पती व मुले यांनी वादींचे काम बंद पाडले. सबब सदर बाबत खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येण्यासाठी वादी यांनी वृक्ष अधिकारी तथा परिक्षेत्र वन अधिकारी कडगांव यांना साक्षीसाठी हजर राहण्याकरीता साक्षी समन्स पाठविणेची विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन तीव्र आक्षेप नोंदवला. प्रतिवादी यांच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा चौकशीवर अथवा आदेशावर स्थगित नाही. सबब सदर अर्ज चालणेस पात्र नाही. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०४. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०५.     प्रस्तुत दावा वादी यांनी प्रतिवादींच्या विरुध्द वाटणीसाठी, स्वतंत्र कब्जासाठी, हक्कज्ञापन व मनाईसाठी दाखल केलेला आहे. मान्य परिस्थितीनुसार, अद्याप प्रस्तुत दाव्यामध्ये अद्याप न्यायालयामार्फत मुद्दे काढण्यात आलेले नाहीत. तसेच सदरचा दावा अद्याप पुराव्याकरीता नेमण्यात आलेला नाही. अशा परिस्थितीत प्रस्तुतचा अर्ज सद्य स्थितीत मंजूर करणे न्यायोचित होणार नाही. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2023.11.06 15:38:02 +0530

दिनांक ०६/११/२०२३.  **( व्ही. बी. मुल्ला )**
ठिकाण - गारगोटी  दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी